महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२(२)(४)/२०२३/तेवीस दिनांक:- १८ मे, २०२४.

# -: प्रसिद्धीपत्रक :-

विषय :- <u>महाराष्ट्र अराजपत्रित, गट- ब सेवा मुख्य परीक्षा - २०२३ (जाहिरात क्रमांक ०७०/२०२३).</u>
संमती विकल्प मागविणेबाबत.

उपरोक्त विषयांकित परीक्षेसंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी मूळ अर्ज क्र.५६९/२०२४ प्रकरणी दिलेल्या दिनांक १० मे, २०२४ रोजीच्या निर्देशानुसार फक्त दुय्यम निबंधक (श्रेणी-१)/ मुद्रांक निरीक्षक आणि राज्यकर निरीक्षक या पदावर नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेल्या तसेच तात्पुरत्या निवड यादीत समाविष्ट झालेल्या सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील उमेदवारांकडून ते कोणत्या संवर्गाकरिता प्रथम पसंती (First Choice) देत आहेत, याबाबत त्यांचे संमती विकल्प (Consent Submission) मागविण्यात येत आहेत. या अनुषंगाने त्यांच्या प्रोफाइल मध्ये संमती विकल्प उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्यानुसार उमेदवाराचा विचार फक्त संमती विकल्प दिलेल्या संवर्गासाठी करण्यात येईल. त्यासाठी उमेदवारास 'स्विकारले' '(Accepted)' हा पर्याय निवडावा लागेल. उर्वरित संवर्गांसाठी उमेदवारास 'Give up 1'/'Give up 2' हा पर्याय निवडावा लागेल. ज्या संवर्गांसाठी 'Give up 1'/'Give up 2' पर्याय निवडला आहे, त्या संवर्गांकरिता त्यांच्या उमेदवारीचा विचार न करता इतर उमेदवारांचा गुणवत्तेवर विचार करण्यात येईल.

२. प्रस्तुत परीक्षेसाठी संमती विकल्प (Consent Submission) सादर करण्याकरीता आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील 'ONLINE FACILITIES' या मेनूमध्ये 'Consent Submission' वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंक दिनांक २० मे, २०२४ ते दिनांक ३० मे, २०२४ या कालावधीत सुरु राहील.

३. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या आदेशानुसार संमती विकल्प मागविण्यात येत असल्याने सदर संमती विकल्प ऑनलाईन पध्दतीने आयोगास सादर करणे अनिवार्य आहे.

४. आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या उपरोक्त कालावधीत विहीत ऑनलाईन पध्दतीने संमती विकल्प सादर न केल्यास संबंधित उमेदवाराचा अंतिम निवडीकरिता विचार करण्यात येणार नाही.

५. संमती विकल्प (Consent Submission) सादर करण्यास कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ई-मेल आयडीवर विहित कालावधीत संपर्क साधता येईल.

उपसचिव(परीक्षोत्तर)(अराजपत्रित)
ठिकाण : नवी मुंबई महाराष्ट्र लोकसेवा आयोग